# जिल्हाधिकारी कार्यालय अहमदनगर

**(आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन कक्ष)**

scy.ahmednagar@gmail.com (टोल फ्री क्रं.1077) दुरध्वनी क्र. 0241-2343600

---

**विषय -** **कोरोना विषाणू (कोव्हीड19) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपयायोजना करण्याबाबत.**

**वाचावे -**
1. आपत्ती व्यावस्थापन कायदा, 2005
2. साथ रोग अधिनियम, 1897
3. सार्वजनिक आरोग्य विभाग यांची आधिसुचना कोरोना 2020/प्र.क्र.58/आरोग्य5दि.14/03/2020
4. शासन अधिसूचना क्रमांक डीएमयु/2020/प्र.क्र.92/डीआयएसएम-1 दिनांक 25मार्च 2020.
5. शासन अधिसूचना क्रमांक डीएमयु/2020/प्र.क्र.92/डीआयएसएम-1 दिनांक 13 एप्रिल 2020.
6. महसुल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील आदेश क्र.डीएमयु/2020/सीआर-92/डीएसएम-1, दि.17 एप्रिल 2020.
7. महसुल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील आदेश क्र.डीएमयु/2020/सीआर-92/डीएसएम-1, दि.30 एप्रिल 2020.
8. या कार्यालयाकडील आदेश क्र.आव्यमपु/कार्या 19अ/364/2020 दि.30/04/2020
9. या कार्यालयाकडील आदेश क्र.आव्यमपु/कार्या 19अ/366/2020 दि.01/05/2020

क्र.आव्यमपु/कार्या 19अ/392/2020 **आदेश** अहमदनगर दिनांक05 /05/2020

ज्याअर्थी, राज्य शासनाने कोरोना विषाणूचा (कोव्हीड 19) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग अधिनियम 1897 दिनांक 13 मार्च 2020 पासून लागू करुन खंड 2,3,4 मधील तरतुदीनुसार अधिसुचना निर्गमित केलेली आहे. त्याअन्वये जिल्हाधिकारी हे त्यांचे कार्यक्षेत्रात कोव्हीड 19 वर नियंत्रण आणण्यासाठी व त्यांचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी ज्या उपाययोजना करणे आवश्यक आहे त्या करण्यासाठी सक्षम प्राधिकारी घोषीत करण्यात आलेले आहेत.

ज्याअर्थी, संदर्भ क्र. 8 व 9 अन्वये लॉकडाऊन मुळे अहमदनगर जिल्हयात व राज्यामधील इतर जिल्हयां मध्ये वा इतर राज्यामध्ये अडकलेल्या स्थलांतरीत मजुर, पर्यटक, भाविक, विदयार्थी व इतर व्यक्तींना त्यांचे वास्तवांच्या मुळ ठिकाणी परतण्याकामी आदर्श कार्यपध्दतीनुसार कार्यवाही करणेकामी पथकांची नियुक्ती करण्यात आली आहे. जिल्हयातून महाराष्ट्र राज्यांतर्गत इतर जिल्हयामध्ये जाण्यासाठी मोठया प्रमाणावर नागरिकांचे अर्ज प्राप्त होत आहे. सदर अर्जाच्या परवानगीसाठी तहसिलदार तथा घटना व्यवस्थापक यांना त्यांचे कार्यक्षेत्रातील नागरिकांची होणारी गैरसोय टाळणे व त्वरीत निर्णय घेणे आवश्यक आहे.

त्याअर्थी, मी, जिल्हाधिकारी, अहमदनगर साथ रोग अधिनियम 1897 अन्वये निर्गमित करण्यात आलेली अधिसुचना व नियमावलीमधील तरतुदीनुसार व आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005 कलम 30 अन्वये मला प्राप्त अधिकारानुसार **तहसिलदार तथा घटना व्यवस्थापक यांना त्यांचे कार्यक्षेत्रात महाराष्ट्र राज्यांतर्गत इतर जिल्हयामध्ये जाण्यासाठी प्राप्त होणा-या अर्जावर तात्काळ निर्णय घेऊन** Annexure A **निर्गमित करणेकामी प्राधिकृत करण्यात येत आहे.**

1. तहसिलदार तथा घटना व्यवस्थापक यांनी त्यांचे कार्यक्षेत्रात प्राप्त होणा-या अर्जानुसार जिल्हानिहाय यादया तयार कराव्यात.

2. अशा सर्व व्यक्तींची वैदयकिय तपासणी करून वैदयकिय प्रमाणपत्र प्राप्त करून संबंधीत व्यक्तीकडे देण्याचे नियोजन करावे.

3. अशा प्रवाशांना ज्या जिल्हयात जायचे आहे त्या जिल्हयाचे जिल्हाधिकारी अथवा प्राधिकृत अधिकारी यांची आवश्यक ती परवानगी असल्याची खात्री करावी.

4. ज्या प्रवाशांना जाण्यासाठी स्वतःच्या वाहनांची व्यवस्था नसेल अशा परिस्थितीत संबंधीत आगार व्यवस्थापक महाराष्ट्र राज्य परिवहन, मंडळ यांचेशी समन्वय साधून अशा प्रवाशांना संबंधीत जिल्हयात पाठविण्यासाठी बसेसची व्यवस्था करावी.

5. प्रवासी बसेसचे निर्जंतुकीकरण, Social Distanceing सह प्रवासी व्यक्तींची आसन व्यवस्था इ. बाबींची सुयोग्य खात्री करून बसेस रवाना करण्याची कार्यवाही करावी.

6. अडकलेले मजूर, भाविक, विदयार्थी, पर्यटक यांना अशा प्रकारच्या वाहतूकीसाठी प्राधान्य दयावे.

7. कुठल्याही परिस्थितीत वैयक्तिक पासेस देण्यात येवू नयेत.

जिल्हाधिकारी
अहमदनगर

(राहुल द्विवेदी)
**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, अहमदनगर**

**प्रति,**

**तहसीलदार तथा घटना व्यवस्थापक (Incident Commandar) (सर्व)**

**प्रतः-** 1. जिल्हा पोलीस अधिक्षक, अहमदनगर यांचेकडेस माहितीसाठी अग्रेषीत
2. आयुक्त, महानगरपालीका, अहमदनगर यांचेकडेस माहितीसाठी.
3. संबंधीत नोडल अधिकारी यांचेकडेस माहिती व कार्यवाहीसाठी
4. जिल्हा माहिती अधिकारी, अहमदनगर यांचेकडेस प्रसिध्दीसाठी.
5. विभागीय नियंत्रण, महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ, अहमदनगर यांचेकडेस माहिती व कार्यवाहीसाठी
6. उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, अहमदनगर/श्रीरामपूर यांचेकडेस माहिती व कार्यवाहीसाठी
7. उपविभागीय अधिकारी (सर्व)------------------ यांचेकडेस माहिती व कार्यवाहीसाठी.